**ठळक बातम्या**

- येत्या ५ वर्षात सर्वांचं वीज बिल कमी करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही
- दिल्ली विधानसभा निवडणुकीत संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सुमारे ५८ टक्के मतदान
- रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीची तीन दिवसीय बैठक मुंबईत सुरू

**आणि**

- फिलिपिन्सच्या उपराष्ट्रपती सारा दुतेर्ते यांच्याविरुद्ध महाभियोग प्रस्ताव दाखल

**<><><><><><>**

येत्या पाच वर्षात वीज बिल कमी करुन सर्व ग्राहकांना दिलासा देण्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिलं. बीडमध्ये एका कार्यक्रमात ते बोलत होते. ऊर्जा विभागाने पुढच्या पाच वर्षाचे वीजेचे दर काय असतील, याची पिटीशन दाखल केली. त्यामुळे घरगुती आणि औद्योगिक वीजेचे दर कमी होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

मुख्यमंत्री सौर कृषी वीज योजनेचं काम मार्च २०२७ पर्यंत पूर्ण होईल, आणि राज्यभरातल्या सर्व शेतकऱ्यांना लागणारा १६ हजार मेगावॅट वीज पुरवठा दिवसा केला जाईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

नदीजोड प्रकल्पाचं काम येत्या वर्षभरामधे सुरू करू, अशी ग्वाही त्यांनी दिली. मराठवाड्यातला दुष्काळ इतिहासजमा करता येईल, त्यासाठीचा आराखडा तयार आहे असं मुख्यमंत्री म्हणाले. पश्चिमी वाहिन्यांचं समुद्रात वाहून जाणारं पाणी जोर्यंत गोदावरीच्या खोऱ्यात आणलं जाणार नाही तोपर्यंत मराठवाडा दुष्काळमुक्त

होऊ शकत नाही, हे पाणी गोदावरीच्या खोऱ्यात आणलं जाईल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**होल्ड बाईट मुख्यमंत्री - (२७ सेकंद)**

महायुती सरकारच्या काळात जलयुक्त शिवारच्या माध्यमातून सिंचनाचं काम केलं. त्यामुळे मराठवाड्यातली भूजल पातळी वाढली, असं मुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते खो खो विश्वचषक स्पर्धेतल्या विजेत्या संघातले खेळाडू प्रतिक वाईकर, प्रियांका इंगळे, राम  कश्यप, सुयश गरगटे, अश्विनी शिंदे, रेश्मा राठोड आणि प्रशिक्षक प्राची वाईकर, शिरीन गोडबोले यांचा सत्कार झाला.

**<><><><><>**

पुढच्या पाच वर्षात म्हाडाच्या माध्यमातून आठ लाख घरं उभारली जाणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. ते आज ठाण्यात कोकण विभागातली म्हाडाची लॉटरी काढताना बोलत होते. लोकांचा विश्वास म्हाडावर आहे, त्यामुळे लॉटरी निघाल्यावर घरांचा ताबा लवकर द्या, चांगल्या दर्जाचं घर द्या, घरांची गुणवत्ता आम्ही तपासू, असंही त्यांनी सांगितलं.

म्हाडानं गेल्या दीड वर्षात ३ लॉटरी काढल्या असून यापुढंही म्हाडाच्या माध्यमातून अशाच पद्धतीनं लॉटरी काढली जाणार आहे. दरवर्षी म्हाडाच्या माध्यमातून ३० हजार घरांची लॉटरी काढली जाणार असल्याचं म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी, यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी आज संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सुमारे ५८ टक्के मतदान झालं आहे. या निवडणुकीसाठी एकूण ६९९ उमेदवार रिंगणात आहेत आणि मतमोजणी ८ फेब्रुवारीला होणार आहे. आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल, दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी आणि दिल्लीचे मंत्री गोपाल

राय, भाजपचे विजेंदर गुप्ता, परवेश वर्मा, रमेश बिधुरी आणि कैलाश गहलोत हे निवडणूक रिंगणात आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, सरन्यायाधिश संजीव खन्ना, केंद्रीय मंत्री एस. जयशंकर आणि हरदीप सिंह पुरी, कॉंग्रेस नेते सोनिया गांधी आणि राहुल गांधी, लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, दिल्लीचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना, आणि दिल्लीच्या मुख्यमंत्री अतिशी यांनी आज मतदानाचा हक्क बजावला. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार, निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि ज्ञानेश कुमार, प्रधानमंत्र्यांचे मुख्य सचिव पी. के. मिश्रा, दिल्ली पोलिस आयुक्त संजय अरोरा यांनी देखील सकाळी मतदान केलं आहे.

तामिळनाडूमधल्या इरोड पूर्व आणि उत्तर प्रदेशातल्या मिल्कीपूरमध्येही आज विधानसभा पोटनिवडणुकीसाठी मतदान झालं.

**<><><><><><>**

जागतिक पातळीवर एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराची स्पर्धा तीव्र होत असून भारतानं यासंबंधात व्यापक धोरण आखल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज ओपन एआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी सॅम ऑल्टमन यांची नवी दिल्लीत भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते. एआय संदर्भातलं पुढचं धोरण तयार करण्याच्या मुद्द्यावर ऑल्टमन यांच्याशी सविस्तर चर्चा झाली असून ऑल्टमन यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या तंत्रज्ञानविषयक धोरणाचं कौतुक केलं आहे, असं वैष्णव यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात सांगितलं.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री गतीशक्ती योजना, राष्ट्रीय लॉजिस्टिक धोरणासारख्या उपक्रमांमुळे झालेल्या पायाभूत सुविधांच्या विकासामुळे भारत २०३० पर्यंत

जागतिक बँकेच्या क्रमवारीत पहिल्या २५ देशांमध्ये स्थान मिळवेल, असं एका अहवालात म्हटलं आहे. जागतिक बँकेच्या लॉजिस्टिक्स कामगिरी निर्देशांकात १३९ देशांमध्ये भारत ३८ व्या क्रमांकावर असून २०३० पर्यंत पहिल्या २५ मध्ये येण्याचं लक्ष्य आहे. EAC इंटरनॅशनल कन्सल्टिंग आणि मेस्से स्टुटगार्ट इंडियानं केलेल्या तयार केलेल्या या अहवालाचं प्रकाशन काल झालं.

<><><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज प्रयागराज इथं महाकुंभ मेळ्यातल्या त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान केलं. त्यानंतर त्यांनी उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासोबत बोटीतून संगमावर फेरी मारली. गंगा, यमुना आणि सरस्वती या नद्यांच्या त्रिवेणी संगमावर प्रधानमंत्र्यांनी पूजा केली.

त्रिवेणी संगमावरचं स्नान ही दैवी अनुभूती असून त्यावेळी कुंभमेळ्यात सहभागी झालेल्या कोट्यवधी भाविकांप्रमाणे आपलं मनही भक्तिमय झालं होतं, अशा भावना प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावर व्यक्त केल्या. जीवनदायिनी गंगा देशवासियांना शांती, सद्बुद्धी, उत्तम आरोग्य आणि सौहार्दाचा आशीर्वाद देईल, असंही मोदी यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><><>

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीची तीन दिवसीय बैठक आजपासून मुंबईत सुरू झाली. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक येत्या शुक्रवारपर्यंत सुरू राहणार आहे. शुक्रवारी सकाळी मल्होत्रा व्याजदरांबाबतचे समितीचे निर्णय जाहीर करतील. फेब्रुवारी २०२३ पासून रिझर्व्ह बँकेने रेपो दर साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवला आहे.

<><><><><><>

अमेरिकेतून शंभरपेक्षा जास्त भारतीय अवैध स्थलांतरितांना हद्दपार करण्यात आलं असून ते आज पंजाबमधे अमृतसर इथल्या श्री गुरू रामदासजी आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचले. यातले ३० जण पंजाबमधले, तर इतर जण चंडीगढ, हरियाणा, गुजरात, महाराष्ट्र आणि उत्तरप्रदेशातले आहेत. सर्व स्थलांतरितांच्या माहितीची पडताळणी सुरू आहे. अमेरिकेत ट्रम्प सरकार आल्यानंतर भारतीयांची ही पहिलीच हद्दपारी आहे.

<><><><><>

इस्राइली मुस्लिमांचे आध्यात्मिक मार्गदर्शक प्रिन्स करीम आगा खान चतुर्थ यांचं पोर्तुगालमध्ये ८८व्या वर्षी निधन झालं. आगाखान यांचा दफनविधी लिस्बन इथं होणार आहे. ते वयाच्या विसाव्या वर्षी इमाम बनले. त्यांनी आगाखान डेव्हलपमेंट नेटवर्कचं नेतृत्व केलं. होतं. जवळपास ३० देशांमध्ये या संस्थेनं आरोग्य, शिक्षण क्षेत्रात काम केलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी खान यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

<><><><><>

फिलिपिन्सच्या उपराष्ट्रपती सारा दुतेर्ते यांच्याविरुद्ध संसदेत आज महाभियोग प्रस्ताव दाखल करण्यात आला. राष्ट्रपतींसोबत राजकीय मतभेद असलेल्या दुतेर्ते यांच्या विरुद्ध सदस्यांनी यावेळी मतदान केलं. दुतेर्ते यांच्या विरुद्ध महाभियोग चालवण्यासाठी संसदेच्या २१५ सदस्यांनी मतदान केल्याचं सरचिटणीस रेजिनाल्ड वेलास्को यांनी सांगितलं.

<><><><><>

भारत विरुद्ध इंग्लंड एकदिवसीय क्रिकेट मालिकेच्या सामन्याची तिकिटं विकत घेताना कटकमध्ये आज चेंगराचेंगरी झाली. या चेंगराचेंगरीमध्ये अनेक

जणांना भोवळ आल्याची, तर काही जण जखमी झाल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

**<><><><><><>**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राने सर्वाधिक ८२ पदकांची कमाई केली आहे. त्यात १६ सुवर्ण, ३५ रौप्य आणि ३१ कास्यपदकांचा समावेश आहे.

**//<><><><><><>//**